# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.01.2026** **वार- शुक्रवार**

---

-राज्यातल्या 29 महापालिकांच्या निवडणुकीचे कल स्पष्ट; पुणे, मुंबई, पिंपरी चिंचवडमध्ये भाजपा बहुमतांच्या वाटेवर

- सिकल सेल ॲनिमियावर ‘सिकल आधार ॲप ही एकात्मिक डिजिटल प्रणाली विकसित

आणि,

- पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात महिला दिग्दर्शकांची मोठी संख्या

**<u>पुणे</u>**

पुणे महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षानं निर्णायक आघाडी घेतली असून एकहाती सत्ता स्थापन करण्याचा पक्षाचा मार्ग मोकळा झाला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा, महापालिकेच्या 165 पैकी सत्ता स्थापनेसाठी आवश्यक असणारी 83 जागांची आकडेवारी भाजपनं पार केली असून मोठा विजय मिळवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एकत्र आले असले तरी त्यांना फार मोठे यश मिळवता आलेलं नाही.

प्रभाग क्रमांक 20 शंकर महाराज मठ बिबवेवाडी प्रभागातून भाजपचे राजेंद्र शेळीमकर, तन्वी दिवेकर, मानसी देशपांडे तर राष्ट्रवादी काँग्रेसचे गौरव घुले विजयी झाले आहेत

प्रभाग क्रमांक एक कळस धानोरीमधून भाजपचे अनिल टिंगरे, संगीता दांगट, अश्विनी भंडारे, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या रेखा टिंगरे विजयी झाल्या आहेत.

प्रभाग क्रमांक दहा बावधन सुस मधून भाजपचे किरण दगडे पाटील, दिपाली पवार, अल्पना वर्पे आणि दिलीप वेडे पाटील हे चारही उमेदवार विजयी झाले आहेत.

प्रभाग क्रमांक तीन विमान नगर लोहगाव वाघोली इथून भाजपचे श्रेयस खांदवे, अनिल सातव, ऐश्वर्या पठारे आणि रामदास दाभाडे हे चारही उमेदवार विजयी झाले आहेत.

प्रभाग क्रमांक 33 खडकवासला शिवने इथून भाजपच्या धनश्री कोल्हे आणि सुभाष नाणेकर तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे काका चव्हाण आणि अनिता इंगळे विजयी झाले आहेत.

प्रभाग क्रमांक 38 मधून भाजपचे परशुराम वाडेकर, अजित गायकवाड, सपना छाजेड आणि सनी निम्हण हे चारही उमेदवार विजयी झाले आहे.

प्रभाग क्रमांक 25 शनिवार पेठ, मंडई प्रभागातून भाजपचे राघवेंद्र मानकर, स्वरदा बापट, कुणाल टिळक आणि स्वप्नाली पंडित हे विजयी झाले आहेत. राघवेंद्र मानकर यांनी सर्वाधिक 28 हजार 610 मतांची आघाडी घेतली. या प्रभागातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या रूपाली पाटील ठोंबरे या पराभूत झाल्या आहेत. रूपाली पाटील यांनी मतमोजणी दरम्यान काही आक्षेप घेतल्यानं इथे मतमोजणी काही काळ थांबवण्यात आली होती.

प्रभाग क्रमांक सात गोखले नगर वाकडेवाडी इथून राष्ट्रवादी काँग्रेसचे निलेश निकम, दत्ता बहिरट अंजली ओरसे तर भाजपच्या निशा मानवतकर विजयी झाल्या आहेत.

प्रभाग क्रमांक चार खराडी वाघोली इथून भाजपचे शैलजित बनसोडे, रत्नमाला सातव, तृप्ती भरणे आणि सुरेंद्र पठारे हे चारही उमेदवार विजयी झाले आहेत.

काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष अरविंद शिंदे हे प्रभाग क्रमांक 13 पुणे स्टेशन जय जवान नगरमधून विजयी झाले आहेत. याच प्रभागातून काँग्रेसच्या सुरैया नदाफ आणि वैशाली भालेराव विजयी झाल्या असून भाजपचे निलेश आल्हाट विजयी झाले आहेत.

प्रभाग क्रमांक 37 धनकवडी कात्रज डेअरी येथून भाजपचे किशोर धनकवडे, वर्षा तापकीर, अरुण राजवाडे आणि तेजश्री बदक हे चारही उमेदवार विजयी झाले आहेत.

प्रभाग क्रमांक 21 मुकुंदनगर सॅलिसबरी पार्क येथून भाजपचे प्रसन्न वैरागे, सिद्धी शेळीमकर मनीषा चोरबेले आणि श्रीनाथ भिमाले हे चारही उमेदवार विजयी झाले आहे.

प्रभाग क्रमांक 29 हॅप्पी कॉलनी डेक्कन जिमखाना इथून भाजपचे पुनीत जोशी, मिताली सावळेकर, सुनील पांडे आणि मंजुश्री खर्डेकर हे चारही उमेदवार विजयी झाले आहेत.

पुणे शहरात अत्यंत अटीतटीच्या झालेल्या प्रभाग क्रमांक 36 सहकार नगर पद्मावती प्रभागातून भाजपचे महेश वाबळे, शैलजा भोसले आणि वीणा घोष विजयी झाले आहेत. पुण्यातील सर्वात तरुण नगरसेवक म्हणून भाजपच्या सई थोपटे याच प्रभागातून विजयी  झाल्या असून त्या 22 वर्षांच्या आहेत. या प्रभागातून आतापर्यंत सहा वेळा निवडून आलेले आणि निवडणुकीपूर्वी शिवसेनेत प्रवेश केलेले माजी उपमहापौर आबा बागुल पराभूत झाले आहेत.

**पिंपरी-चिंचवड**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूकीतही भाजपाला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचं चित्र आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा 32 प्रभागातल्या 128 जागांपैकी भारतीय जनता पक्ष 85 जागांवर आघाडीवर आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ते 30 जागांवर आघाडीवर आहे. शिवसेना पक्षाच्या सात उमेदवारांनी आघाडी घेतली आहे.

भारतीय जनता पक्षाचे रवी लांडगे आणि कल्पना चांदगुडे बिनविरोध निवडून आल्यानं 126 जागांसाठी मतमोजणी होत आहे.

गेल्या सात वर्षातल्या भाजपाच्या कारभाराला पोचपावती म्हणून पिंपरी-चिंचवडकरांनी भाजपाच्या पारड्यात भरभरून मतं टाकली असल्याचं चित्र आहे.

**गडकरी**

महापालिका निवडणुकांमध्ये भाजपाला मिळालेल्या यशाबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सर्वांचं अभिनंदन केलं आहे. महाराष्ट्रातील सर्व २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये भाजप-शिवसेना महायुतीला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, चंद्रशेखर बावनकुळे आणि समस्त पक्ष कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन, विकासाला प्राधान्य देत भाजप-महायुतीवर विश्वास दाखवलेल्या राज्यातील जनतेचे आभार, असं संदेश गडकरी यांनी पाठवला आहे.

**अनुदान**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना 2025-26 अंतर्गत पुणे जिल्ह्यात 2 कोटी 17 लाख रुपयांचं अनुदान वितरित करण्यात आलं आहे. मान्य झालेल्या 110 प्रस्तावांपैकी मृत्यू

झालेल्या शेतकऱ्यांची संख्या 107 आणि अपंगत्व आलेले शेतकरी 3 असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.

<u>सिकलसेल</u>

सिकल सेल ॲनिमिया हा हिमोग्लोबिनवर परिणाम करणारा अनुवांशिक आजार असून, देशातल्या विशेषतः आदिवासी आणि ग्रामीण भागांमध्ये या आजाराचं प्रमाण मोठ्या प्रमाणावर आढळतं. या गंभीर समस्येवर तंत्रज्ञानाधारित उपाय सुचवित, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. पूजा दोशी आणि त्यांच्या संशोधक चमूने 'सिकल आधार ॲप' ही एकात्मिक डिजिटल प्रणाली विकसित केली आहे. ही प्रणाली सिकल सेल रुग्णांचं जीवनमान उंचावण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

सिकल सेल आजारात लाल रक्तपेशी विळ्यासारख्या होऊन शरीरातील अवयवांकडे जाणारा रक्तप्रवाह अडथळित होतो.

या साठी मोठ्या प्रमाणावर तपासण्या होत असल्या तरी समुपदेशन, मानसिक आरोग्य सहाय्य, पोषण मार्गदर्शन, रुग्णांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, रक्तपेढ्यांपर्यंत तात्काळ पोहोच आणि समाजजागृती यामध्ये अजूनही मोठ्या उणिवा आहेत. रुग्णांना वारंवार रुग्णालयात दाखल होणे, कमी हिमोग्लोबिन, सामाजिक कलंक आणि उपचारांची अपुरी माहिती यांचा सामना करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर प्रा. डॉ. पूजा दोशी यांच्या संशोधन गटाने यापूर्वी हिमाधार ही सिकल सेल क्रायसिस व्यवस्थापनासाठी उपयुक्त हर्बल औषधी संरचना विकसित केली असून तिला पेटंट मंजूर झालं आहे. त्याच संशोधनाचा पुढील टप्पा म्हणून AI-आधारित 'सिकल आधार ॲप' संकल्पना सादर करण्यात आली आहे.

**पिफ**

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा जल्लोष सध्या पुण्यात सुरू आहे. यावर्षी महिला दिग्दर्शकांची खूप मोठी संख्या असून, 130 चित्रपटांपैकी 45 महिला दिग्दर्शकांच्या चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. जागतिक चित्रपट स्पर्धा, ग्लोबल सिनेमा, भारतीय चित्रपट, आणि माहितीपट अशा विविध विभागांत या चित्रपटांचा समावेश आहे.

महोत्सवाच्या जागतिक चित्रपट स्पर्धा विभागात सहा महिला दिग्दर्शिकांचे चित्रपट दाखवले जाणार आहेत.

नातेसंबंध, त्यातील तणाव, सामाजिक विषमता, राजकीय संघर्ष अश्या विविध विषयांवर या चित्रपटांमधून भाष्य करण्यात आले आहे. ग्लोबल सिनेमा विभागात आसामच्या दिग्दर्शिका मंजू बोरा यांचा 'मर्डर्स टू क्लोज – लव्ह टू फार' हा भारत-इस्रायल सहनिर्मितीतील चित्रपट, प्रेमसंबंध, हत्या आणि राजकीय संघर्ष यांवर आधारित आहे. हा चित्रपट मंजू बोरा आणि इस्रायलचे दिग्दर्शक डॅन वोलमन यांनी संयुक्तपणे दिग्दर्शित केला असून, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ अर्थात एनएफडीसी नं या चित्रपटाला पाठबळ दिले आहे.

महाराष्ट्रातील दिग्दर्शिका ईशा पुंगलिया यांचा 'ओस्लो : अ टेल ऑफ प्रॉमिस' हा माहितीपट चित्रपट महोत्सवात दाखवला जाणार आहे. तसंच, जिजीविशा काळे यांचा 'मदरहूड – तिघी' हा चित्रपट मराठी चित्रपट स्पर्धा विभागातून निवडण्यात आला आहे. जो स्त्रियांच्या जीवनाबद्दल विविध पैलू मांडतो. "पिफमध्ये महिला दिग्दर्शकांची संख्या वाढणे ही अत्यंत सकारात्मक बाब असल्याचं जिजीविशा काळे यांनी सांगितलं.

**पुणेग्रँडटूर**

पुणे ग्रँड चॅलेंज टूर ही सायकलिंग स्पर्धा 19 ते 24 जानेवारी दरम्यान होणार आहे. पुण्यातून ही स्पर्धा 19 जानेवारी रोजी जाणार असून स्पर्धेच्या मार्गांवरील रस्ते रात्री 12 ते संध्याकाळी 7 या वेळेत अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्वांसाठी टप्प्याटप्प्याने बंद राहणार आहेत. या मध्ये फर्ग्युसन कॉलेज रस्ता, सिमला ऑफिस चौक, जंगली महाराज रस्ता याचा समावेश आहे, याची नोंद घ्यावी, असं पुणे पोलिसांनी कळवलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात सकाळच्या वेळी हवेत गारवा आणि धुके आहे. कमाल तापमानात काहीशी वाढ संभवत असून कमाल तापमान 31 तर किमान तापमान 13 अंशांच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर,**

**संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**